**International Journal of Research in Social Sciences**
Vol. 15 Issue 01, January 2025,
ISSN: 2249-2496 Impact Factor: 7.081
Journal Homepage: http://www.ijmra.us, Email: editorijmie@gmail.com
Double-Blind Peer Reviewed Refereed Open Access International Journal - Included in the International Serial Directories Indexed & Listed at: Ulrich's Periodicals Directory ©, U.S.A., Open J-Gate as well as in Cabell's Directories of Publishing Opportunities, U.S.A

# भारतीय राज्यघटनेतील कलम ३७०: एक घटनात्मक विश्लेषण

**श्री.जयपाल व्यंकटी कांबळे**
**संशोधक विद्यार्थी - स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड**
**संशोधक मार्गदर्शक - डॉ. प्रताप वामनराव पाटील**

## प्रस्तावना

भारतीय राज्यघटना ही लोकशाही, सार्वभौमत्व आणि विविधतेतील एकतेचे प्रतीक आहे. स्वातंत्र्यानंतर भारतासमोर सर्वात मोठे आव्हान होते ते म्हणजे ५६५ संस्थानांचे विलीनीकरण करून नव्या राष्ट्राची घडण करणे. भारतीय राज्यघटना २६ नोव्हेंबर १९४९ रोजी तयार झाली आणि २६ जानेवारी १९५० पासून लागू झाली. भारतीय संविधानामध्ये भारतातील सर्व राज्ये आणि प्रांतांना एकसंघ ठेवण्याचे प्रयत्न केले गेले. मात्र, जम्मू-काश्मीर या संस्थानाला स्वतंत्र घटनात्मक दर्जा देण्यात आला. त्यानुसार घटनेत कलम ३७० आणि अनुच्छेद ३५अ तरतुद करण्यात आली.यानुसार जम्मु व काश्मीर राज्याला विशेष दर्जा प्रदान करण्यात आला.

भारत स्वातंत्र झाल्यानंतर सरदार वल्लभभाई पटेल आणि व्ही.पी.मेनन यांच्या प्रयत्नांमुळे ५६५ संस्थानांचे विलीनीकरण करण्यात आले. बहुतांश संस्थानांनी कोणत्याही अटीशिवाय भारतात विलीन होण्यास सहमती दर्शवली. मात्र, जम्मू-काश्मीरने स्वतंत्र राहण्याचा प्रयत्न केला. पाकिस्तानच्या आक्रमणामुळे २६ ऑक्टोबर १९४७ रोजी महाराजा हरिसिंह यांनी "विलीनीकरण करार" स्वाक्षरी करून भारतात विलीन होण्याचा निर्णय घेतला. हा करार संरक्षण, परराष्ट्र संबंध आणि दळणवळण या क्षेत्रांपुरता मर्यादित होता.जम्मू-काश्मीरला भारतीय राज्यघटनेत विशेष स्थान देण्यात आले. महाराजा हरिसिंह यांनी स्वतंत्र संविधानाचा आग्रह धरला होता, तसेच येथील बहुसंख्य मुस्लिम लोकसंख्येच्या राजकीय आणि सांस्कृतिक अस्मितेचे संरक्षण करणे गरजेचे होते. तत्कालीन पाकिस्तान आणि भारत यांच्यातील तणाव पाहता येथील राजकीय स्थैर्यासाठी विशेष अधिकार देण्यात आले. कलम ३७० भारतीय राज्यघटनेत समाविष्ट करण्यात आले, ज्यामुळे जम्मू-काश्मीरला वेगळे संविधान, स्वतंत्र झेंडा आणि विशेष अधिकार देण्यात आले. हे कलम तात्पुरते असले तरी, पुढे दीर्घकाळ टिकले. १९५४ साली राष्ट्रपती आदेशाद्वारे अनुच्छेद ३५अ लागू करण्यात आले, ज्यामुळे जम्मू-काश्मीर सरकारला 'स्थायी नागरिकत्व' ठरवण्याचा अधिकार मिळाला. यामुळे अन्य राज्यातील लोकांना जम्मू-काश्मीरमध्ये जमीन खरेदी आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये संधी मिळण्यास मर्यादा घालण्यात आल्या.कलम ३७० आणि ३५अ यांच्या माध्यमातून जम्मू-काश्मीरला भारतात विशेष स्थान देण्यात आले.त्याच घटनात्मक तरतूदचा अभ्यास आपण या लेखात करणार आहोत.

International Journal of Research in Social Sciences
Vol. 15 Issue 01, January 2025,
ISSN: 2249-2496 Impact Factor: 7.081
Journal Homepage: http://www.ijmra.us, Email: editorijmie@gmail.com
Double-Blind Peer Reviewed Refereed Open Access International Journal - Included in the International Serial Directories Indexed & Listed at: Ulrich's Periodicals Directory ©, U.S.A., Open J-Gate as well as in Cabell's Directories of Publishing Opportunities, U.S.A

**उद्दिष्टे :-**

**१. कलम ३७० निर्मितीची प्रक्रियाचा अभ्यास करणे.**

**२. कलम ३७० च्या घटनात्मक तरतुदींचा अभ्यास करणे.**

**३. कलम ३७० चे भारतीय राज्यघटनेतील स्थान आणि त्याचा संघराज्यीय रचनेवर झालेला परिणाम विश्लेषित करणे.**

**४. अनुच्छेद ३५अ च्या तरतुदी आणि जम्मू-काश्मीरच्या विशेष अधिकारांवर त्याचा प्रभाव अभ्यासणे.**

**कलम ३७० निर्मितीची प्रक्रिया: अभ्यास**

**१. ऐतिहासिक पार्श्वभूमी**

**कलम ३७० ची निर्मिती भारताच्या फाळणी आणि स्वातंत्र्याच्या काळात घडलेल्या घटनांशी जोडलेली आहे. १९४७ मध्ये जेव्हा भारत आणि पाकिस्तान स्वतंत्र झाले, तेव्हा ब्रिटिश इंडियातील ५६२ संस्थानांना स्वतःचा मार्ग निवडण्याचा अधिकार देण्यात आला होता. जम्मू आणि काश्मीर हे एक मोठे आणि सामरिकदृष्ट्या महत्त्वाचे संस्थान होते, ज्याच्या सीमा भारत आणि पाकिस्तान दोन्हींना लागून होत्या.जम्मू आणि काश्मीरची परिस्थिती: जम्मू आणि काश्मीरचे तत्कालीन शासक महाराजा हरि सिंग यांनी सुरुवातीला स्वतंत्र राहण्याचा निर्णय घेतला होता. त्यांनी भारत किंवा पाकिस्तानात सामील होण्याचा त्वरित निर्णय घेतला नाही. परंतु ऑक्टोबर १९४७ मध्ये पाकिस्तान-समर्थित कबायली टोळ्यांनी काश्मीरवर आक्रमण केले, ज्यामुळे परिस्थिती बदलली.**

**विलीनीकरण करार (२६ ऑक्टोबर १९४७)**

**आक्रमणाच्या पार्श्वभूमीवर महाराजा हरि सिंग यांनी भारताची सैनिकी मदत मागितली. भारताने ही मदत देण्यासाठी विलीनीकरण करारावर स्वाक्षरी करण्याची अट घातली. २६ ऑक्टोबर १९४७ रोजी महाराजाने हा करार स्वीकारला आणि जम्मू आणि काश्मीर भारताचा भाग बनले. या करारात संरक्षण, परराष्ट्र व्यवहार आणि दळणवळण हे विषय भारताच्या अखत्यारीत आले, तर इतर बाबींवर राज्याला स्वायत्तता देण्यात आली.**

**२. विलीनीकरण कराराचा प्रभाव**

**विलीनीकरण करार (Instrument of Accession) हा कलम ३७० च्या निर्मितीचा पाया ठरला. हा करार इतर संस्थानांपेक्षा वेगळा होता, कारण त्यात जम्मू आणि काश्मीरला विशेष दर्जा देण्याचे संकेत होते. कराराच्या अटींनुसार:**

**१.भारताच्या संसदेची कायदा निर्मितीची शक्ती मर्यादित होती.**

**२.राज्याला स्वतःचे संविधान तयार करण्याचा अधिकार देण्यात आला.**

**३.महाराजाने आपल्या पत्रात (लॉर्ड माउंटबॅटन यांना लिहिलेल्या पत्रात) हे स्पष्ट केले की विलीनीकरण हे तात्पुरत्या संकटाच्या पार्श्वभूमीवर आहे आणि भविष्यात राज्यातील जनतेच्या इच्छेनुसार निर्णय घेतला जाईल.**

**लॉर्ड माउंटबॅटन यांनी २७ ऑक्टोबर १९४७ रोजी या कराराला मान्यता देताना असे नमूद केले की जम्मू आणि काश्मीरच्या जनतेच्या इच्छेचा विचार भविष्यात केला जाईल, ज्यामुळे या विलीनीकरणाला सशर्त स्वरूप प्राप्त झाले.**

**३. संविधान सभेतील चर्चा**

**१९४७ मध्ये भारताच्या स्वातंत्र्यानंतर आणि फाळणीनंतर, जम्मू आणि काश्मीरच्या विलीनीकरणाचा प्रश्न उपस्थित झाला. महाराजा हरि सिंग यांनी २६ ऑक्टोबर १९४७ रोजी भारताशी विलीनीकरण करारावर स्वाक्षरी केली, परंतु त्यात काही अटी होत्या. या अटींनुसार, जम्मू आणि काश्मीरला विशेष दर्जा देण्याची मागणी पुढे आली. संविधान सभेत या मुद्द्यावर चर्चा सुरू झाली तेव्हा भारताच्या एकसंधतेला प्राधान्य देणारे आणि राज्याच्या स्वायत्ततेचा पुरस्कार करणारे असे दोन विचारप्रवाह समोर आले.**

**१. शेख अब्दुल्ला यांची भूमिका**

**जम्मू आणि काश्मीरच्या नॅशनल कॉन्फरन्सचे नेते शेख अब्दुल्ला हे विलीनीकरणाचे समर्थक होते, परंतु त्यांनी राज्याच्या स्वायत्ततेवर विशेष भर दिला. त्यांचा युक्तिवाद होता की, काश्मीरच्या जनतेला त्यांचे स्थानिक हक्क, संस्कृती आणि ओळख अबाधित ठेवण्याची गरज आहे. शेख अब्दुल्ला यांना वाटत होते की, भारतात सामील होताना काश्मीरला पूर्ण स्वायत्तता मिळाली पाहिजे आणि केंद्र सरकारचे अधिकार फक्त संरक्षण, परराष्ट्र व्यवहार आणि दळणवळणापुरते मर्यादित असावेत. त्यांनी या विशेष दर्ज्याला काश्मीरच्या जनतेच्या हिताचे**

**संरक्षण मानले. त्यांच्या या भूमिकेमुळे संविधान सभेत स्वायत्ततेच्या बाजूने एक मजबूत आधार तयार झाला.**

**२. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विरोध**

**संविधान सभेचे अध्यक्ष आणि संविधान निर्मितीचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कलम ३७० च्या निर्मितीला तीव्र विरोध केला. त्यांचे मत होते की, अशा विशेष तरतुदीमुळे भारताच्या एकसंधता आणि अखंडतेला धोका निर्माण होईल. त्यांचा युक्तिवाद होता की, जर एखाद्या राज्याला वेगळा दर्जा दिला गेला, तर इतर राज्यांमध्येही असमाधान निर्माण होऊ शकते आणि देशाच्या एकतेचे धोरण कमकुवत होईल. आंबेडकरांनी या कलमाचा मसुदा तयार करण्यास स्पष्ट नकार दिला आणि त्यांनी ही तरतूद देशाच्या हिताविरुद्ध असल्याचे मत व्यक्त केले. त्यांच्या या विरोधामुळे संविधान सभेत एक वेगळा दृष्टिकोन समोर आला, ज्याने चर्चेला अधिक तीव्रता आणली.**

**३. एन. गोपालस्वामी अय्यंगार यांचे योगदान**

**डॉ. आंबेडकरांच्या नकारानंतर, एन. गोपालस्वामी अय्यंगार यांनी कलम ३७० चा मसुदा तयार करण्याची जबाबदारी स्वीकारली. अय्यंगार हे संविधान सभेचे सदस्य आणि तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांचे जवळचे सहकारी होते. त्यांनी १७ ऑक्टोबर १९४९ रोजी संविधान सभेत हे कलम मांडले आणि त्याचे समर्थन केले. अय्यंगार यांचा युक्तिवाद होता की, जम्मू आणि काश्मीरची परिस्थिती इतर संस्थानांपेक्षा वेगळी आहे. त्यावेळी काश्मीरमध्ये भारत-पाकिस्तान यांच्यातील संघर्ष सुरू होता आणि राज्याची परिस्थिती अस्थिर होती. त्यामुळे त्यांनी ही तरतूद "तात्पुरती" असल्याचे सांगितले आणि ती काश्मीरच्या विशेष परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. त्यांच्या मते, ही तरतूद केंद्र आणि राज्य यांच्यातील समन्वयाचे साधन ठरेल.**

**चर्चेचा परिणाम :- संविधान सभेतील या चर्चेनंतर, कलम ३७० ला संविधानात समाविष्ट करण्याचा निर्णय घेण्यात आला. या कलमाने जम्मू आणि काश्मीरला विशेष दर्जा दिला, ज्यामुळे राज्याला स्वतःचे संविधान, ध्वज आणि स्वायत्तता मिळाली. मात्र, ही तरतूद तात्पुरती असल्याचे सांगितले गेले आणि त्यात बदल करण्याचा अधिकार राष्ट्रपतींना देण्यात आला, परंतु त्यासाठी राज्याच्या संविधान सभेची शिफारस आवश्यक ठरली. शेख अब्दुल्ला यांच्या स्वायत्ततेच्या मागणीला यातून काही प्रमाणात मान्यता मिळाली, तर अय्यंगार यांच्या मसुद्याने भारताच्या एकतेला प्राधान्य देताना काश्मीरच्या विशेष परिस्थितीचा विचार केला.संविधान सभेने या**

**कलमाला मंजुरी दिली आणि ते २६ जानेवारी १९५० रोजी लागू झालेल्या भारतीय राज्यघटनेत कलम ३७० म्हणून समाविष्ट झाले.**

**४. कलम ३७० च्या तरतुदी:-**

**भारतीय संविधानातील कलम ३७० ची निर्मिती प्रक्रिया समजून घेण्यासाठी त्याच्या मुख्य तरतुदी समजणे आवश्यक आहे त्यापुढीलप्रमाणे सविस्तर मांडणी करता येईल.**

**१. उपकलम १(ब): या उपकलमानुसार, भारतीय संसदेची कायदा निर्मितीची शक्ती जम्मू आणि काश्मीर राज्याच्या बाबतीत मर्यादित होती. संसदेला फक्त संरक्षण (Defense), परराष्ट्र व्यवहार (Foreign Affairs) आणि दळणवळण (Communications) या तीन विषयांवर कायदा करण्याचा अधिकार होता. हे विषय भारतीय संविधानाच्या सातव्या अनुसूचीतील केंद्रीय यादी (Union List) अंतर्गत येतात. मात्र, याशिवाय इतर विषयांवर कायदा करण्यासाठी संसदेला जम्मू आणि काश्मीरच्या राज्य सरकारची संमती घ्यावी लागत होती. याचा अर्थ असा की, राज्याला स्वायत्ततेचा एक विशेष अधिकार प्राप्त होता आणि केंद्र सरकार पूर्णपणे राज्याच्या अंतर्गत बाबींवर हस्तक्षेप करू शकत नव्हते. ही तरतूद जम्मू आणि काश्मीरच्या स्वायत्ततेचे प्रतीक मानली जात होती.**

**२. उपकलम १(ड): या उपकलमान्वये, राष्ट्रपतींना विशेष अधिकार देण्यात आला होता. त्यांना राज्य सरकारच्या संमतीने भारतीय संविधानातील इतर तरतुदी जम्मू आणि काश्मीर राज्याला लागू करण्याची शक्ती होती. या प्रक्रियेतूनच पुढे कलम ३५अ ची निर्मिती झाली. कलम ३५अ हे जम्मू आणि काश्मीरच्या नागरिकांना विशेष हक्क प्रदान करते, जसे की जमीन खरेदी करण्याचे अधिकार आणि राज्यातील नोकऱ्यांमध्ये प्राधान्य. हे उपकलम केंद्र आणि राज्य सरकार यांच्यातील समन्वयावर आधारित होते, ज्यामुळे राज्याला संविधानातील इतर तरतुदी स्वीकारण्याची लवचिकता मिळाली. परंतु यासाठी राज्य सरकारची संमती अनिवार्य होती, ज्यामुळे केंद्राला एकतर्फी निर्णय घेण्यापासून रोखले गेले.**

**३. उपकलम ३: या उपकलमानुसार, कलम ३७० मध्ये बदल करण्याचा किंवा ते रद्द करण्याचा अधिकार राष्ट्रपतींना होता. परंतु, हा अधिकार पूर्णपणे स्वतंत्र नव्हता. त्यासाठी जम्मू आणि काश्मीरच्या संविधान सभेची शिफारस आवश्यक होती. याचा अर्थ असा की, राज्याच्या संविधान सभेच्या सहमतीशिवाय हे कलम बदलले किंवा रद्द केले जाऊ शकत नव्हते. ही अट जम्मू आणि काश्मीरच्या जनतेला त्यांच्या भवितव्याच्या निर्णय प्रक्रियेत सहभागी करून घेण्यासाठी ठेवण्यात आली होती. संविधान सभेची शिफारस ही एक प्रकारची कायदेशीर आणि लोकशाहीवादी प्रक्रिया होती, जी १९५० च्या दशकात संविधान सभा विसर्जित होईपर्यंत प्रभावी होती.**

International Journal of Research in Social Sciences
Vol. 15 Issue 01, January 2025,
ISSN: 2249-2496 Impact Factor: 7.081
Journal Homepage: http://www.ijmra.us, Email: editorijmie@gmail.com
Double-Blind Peer Reviewed Refereed Open Access International Journal - Included in the International Serial Directories Indexed & Listed at: Ulrich's Periodicals Directory ©, U.S.A., Open J-Gate as well as in Cabell's Directories of Publishing Opportunities, U.S.A

**५. जम्मू आणि काश्मीर संविधान सभेची भूमिका**

**जम्मू आणि काश्मीर राज्याने भारतात विलीन झाल्यानंतर आपली स्वायत्तता आणि स्वतःचे प्रशासकीय ढाचे कायम ठेवण्यासाठी स्वतंत्र संविधान सभा स्थापन करण्याचा निर्णय घेतला. ही संविधान सभा १९५१ मध्ये स्थापन झाली आणि तिचे कार्य १९५६ पर्यंत चालले. या सभेचे मुख्य उद्दिष्ट होते राज्याचे स्वतःचे संविधान तयार करणे आणि भारताशी असलेल्या संबंधांचे स्वरूप स्पष्ट करणे. १९५१ मध्ये या सभेच्या निवडणुका घेण्यात आल्या, ज्यात नॅशनल कॉन्फरन्स पक्षाने बहुतांश जागा जिंकल्या आणि शेख अब्दुल्ला यांच्या नेतृत्वाखाली ही प्रक्रिया पुढे गेली.या संविधान सभेने १७ नोव्हेंबर १९५६ रोजी जम्मू आणि काश्मीरचे संविधान पूर्ण केले आणि ते २६ जानेवारी १९५७ रोजी औपचारिकपणे स्वीकारले गेले. या संविधानाने जम्मू आणि काश्मीरला भारताचा अविभाज्य घटक म्हणून मान्यता दिली, परंतु त्याचवेळी राज्याला विशेष दर्जा आणि स्वायत्तता प्रदान करणाऱ्या तरतुदी कायम ठेवल्या.**

**६. निर्मिती प्रक्रियेचे विश्लेषण**

**◆ ऐतिहासिक संदर्भ: कलम ३७० ची निर्मिती ही भारत-पाकिस्तान यांच्यातील संघर्ष आणि जम्मू आणि काश्मीरच्या अनिश्चित परिस्थितीचा परिणाम होती. ती एक तडजोडीचा परिणाम होती, ज्याने भारताला काश्मीरवर संरक्षणात्मक अधिकार दिला आणि स्थानिक नेत्यांना स्वायत्ततेचे आश्वासन दिले.**

**◆ संघराज्यवादावरील परिणाम: या कलमामुळे भारताच्या संघराज्य संरचनेत एक असममितीय स्वरूप आले, जिथे जम्मू आणि काश्मीरला इतर राज्यांपेक्षा वेगळा दर्जा मिळाला.**

**◆ विवाद: या प्रक्रियेवर टीका झाली कारण ती पूर्णपणे लोकशाही पद्धतीने घडली नाही. संविधान सभेत यावर फारशी चर्चा झाली नाही आणि काही सदस्यांचा (उदा., आंबेडकरांचा) विरोध असूनही ते स्वीकारले गेले.**

**कलम ३५अ: एक घटनात्मक विश्लेषण**

**उत्पत्ती आणि ऐतिहासिक संदर्भ**

**कलम ३५अ ची सुरुवात थेट भारतीय राज्यघटनेतून झाली नाही, तर ती कलम ३७० अंतर्गत राष्ट्रपतींच्या आदेशाद्वारे १४ मे १९५४ रोजी समाविष्ट करण्यात आली. हा आदेश "संविधान (जम्मू आणि काश्मीरवर लागू) आदेश, १९५४" म्हणून ओळखला जातो. कलम ३७० च्या उपकलम १(ड) नुसार, राष्ट्रपतींना जम्मू आणि काश्मीर सरकारच्या संमतीने राज्यासाठी विशेष**

तरतुदी लागू करण्याचा अधिकार होता. याच अधिकाराचा वापर करून कलम ३५अ अस्तित्वात आले.या तरतुदीची मुळे जम्मू आणि काश्मीरच्या विलीनीकरणाच्या ऐतिहासिक संदर्भात सापडतात. १९४७ मध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यातील फाळणी आणि त्यानंतरच्या संघर्षादरम्यान, जम्मू आणि काश्मीरचे तत्कालीन महाराजा हरि सिंग यांनी भारतात विलीनीकरणाचा निर्णय घेतला. या विलीनीकरण करारात राज्याला विशेष दर्जा देण्याचे आश्वासन होते, ज्याचा एक भाग म्हणून स्थानिक नागरिकांचे हक्क संरक्षित करण्यासाठी कलम ३५अ आणले गेले. शेख अब्दुल्ला यांच्या नेतृत्वाखालील स्थानिक सरकारने राज्यातील जमीन आणि नागरिकत्वाशी संबंधित अधिकार सुरक्षित ठेवण्यावर भर दिला होता.

**कलम ३५अ च्या तरतुदी**

१. स्थायी निवासींची व्याख्या: कलम ३५अ नुसार, जम्मू आणि काश्मीर राज्य सरकारला "स्थायी निवासी" (Permanent Residents) कोण असतील, याची व्याख्या करण्याचा अधिकार देण्यात आला. या व्याख्येचा आधार १९२७ मध्ये महाराजा हरि सिंग यांनी जारी केलेल्या अधिसूचनेवर आधारित होता. या अधिसूचनेनुसार, जे लोक १९११ पूर्वी जम्मू आणि काश्मीर राज्यात स्थायिक झाले होते किंवा त्यांचे वंशज, अशा व्यक्तींना स्थायी निवासी मानले गेले. ही व्याख्या राज्याच्या ऐतिहासिक आणि सामाजिक संदर्भातून उद्भवली होती, ज्याचा उद्देश स्थानिक लोकसंख्येचे हक्क आणि ओळख संरक्षित करणे हा होता.या तरतुदीमुळे राज्य सरकारला एक विशेष अधिकार प्राप्त झाला, ज्याद्वारे ते कोणाला स्थायी निवासी प्रमाणपत्र (State Subject Certificate) द्यायचे आणि कोणाला नाही, हे ठरवू शकत होते. हे प्रमाणपत्र मिळवणे हे राज्यातील विशेष हक्कांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक होते. उदाहरणार्थ, जर एखादी व्यक्ती १९११ नंतर राज्यात आली असेल आणि तिचे वंशज तिथे जन्मले असतील, तरीही त्यांना स्थायी निवासी मानले जाणार नाही, जोपर्यंत त्यांचा आधीचा इतिहास अधिसूचनेनुसार पात्र ठरत नव्हता.

२. विशेष हक्क : कलम ३५अ अंतर्गत, जम्मू आणि काश्मीरच्या स्थायी निवासीयांना काही विशेष हक्क प्रदान करण्यात आले, जे भारताच्या इतर नागरिकांना उपलब्ध नव्हते. हे हक्क खालीलप्रमाणे होते.

◆ जमीन खरेदीचा अधिकार: फक्त स्थायी निवासीयांनाच जम्मू आणि काश्मीरमध्ये जमीन किंवा स्थावर मालमत्ता खरेदी करण्याचा अधिकार होता. ही तरतूद स्थानिक लोकांचे जमिनीवरील हक्क सुरक्षित ठेवण्यासाठी आणि बाहेरील लोकांना राज्यात जमीन खरेदी करण्यापासून रोखण्यासाठी होती.

**International Journal of Research in Social Sciences**
Vol. 15 Issue 01, January 2025,
ISSN: 2249-2496 Impact Factor: 7.081
Journal Homepage: http://www.ijmra.us, Email: editorijmie@gmail.com
Double-Blind Peer Reviewed Refereed Open Access International Journal - Included in the International Serial Directories Indexed & Listed at: Ulrich's Periodicals Directory ©, U.S.A., Open J-Gate as well as in Cabell's Directories of Publishing Opportunities, U.S.A

◆ **राज्य सरकारच्या नोकऱ्या: राज्य सरकारच्या नोकऱ्यांमध्येही फक्त स्थायी निवासीयांनाच प्राधान्य देण्यात येत होते. यामुळे स्थानिकांना रोजगाराच्या संधी मिळाल्या आणि बाहेरील व्यक्तींना राज्यातील सरकारी नोकऱ्यांपासून वंचित ठेवले गेले.**

◆ **शैक्षणिक सवलती: राज्यातील शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश आणि सवलती (उदा. शिष्यवृत्ती) मिळवण्याचा अधिकारही फक्त स्थायी निवासीयांसाठीच मर्यादित होता. यामुळे स्थानिक विद्यार्थ्यांना शिक्षणात प्राधान्य मिळाले. या विशेष हक्कांमुळे जम्मू आणि काश्मीरच्या नागरिकांना त्यांच्या राज्यात एक वेगळी ओळख आणि संरक्षण मिळाले. ही तर ची निर्मिती स्थानिक लोकसंख्येच्या हितासाठी केली गेली होती, जेणेकरून राज्याची लोकसंख्या आणि संसाधने स्थानिकांच्या नियंत्रणात राहतील.**

**३. बाहेरील व्यक्तींवर निर्बंध कलम : ३५अ च्या तरतुदींमुळे भारताच्या इतर भागातील नागरिकांना जम्मू आणि काश्मीरमध्ये मालमत्ता खरेदी करण्यास किंवा तिथे कायमस्वरूपी राहण्यास पूर्णपणे बंदी होती. जर एखाद्या व्यक्तीने राज्यात लग्न केले आणि तिथे राहण्याचा प्रयत्न केला, तरीही तिला स्थायी निवासी म्हणून मान्यता मिळत नव्हती, जोपर्यंत ती १९२७ च्या अधिसूचनेच्या निकषांना पात्र ठरत नव्हती. यामुळे भारताच्या इतर नागरिकांना जम्मू आणि काश्मीरमध्ये जमीन खरेदी करणे किंवा तिथे स्थायिक होणे अशक्य झाले होते.ही बंदी राज्याच्या जनसांख्यिकीय रचनेत बदल होऊ नये आणि स्थानिक संस्कृती आणि ओळख अबाधित राहावी, यासाठी लागू करण्यात आली होती. उदाहरणार्थ, जर एखाद्या व्यक्तीने काश्मिरी महिलेशी विवाह केला, तरीही त्याला मालमत्ता खरेदीचा अधिकार मिळत नव्हता आणि त्याच्या मुलांनाही काही अटींसह स्थायी निवासी दर्जा मिळू शकत होता.**

**कलम ३५अ ची रद्दबातल (५ ऑगस्ट २०१९)**

**५ ऑगस्ट २०१९ रोजी भारत सरकारने कलम ३७० अंतर्गत असलेल्या तरतुदी रद्द केल्या, ज्यामुळे कलम ३५अ आपोआपच निष्प्रभ झाले. राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी जारी केलेल्या आदेशाद्वारे (सीओ २७२) कलम ३७० च्या सर्व तरतुदी रद्द करण्यात आल्या आणि जम्मू आणि काश्मीरला केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा देण्यात आला. या निर्णयाचे खालील परिणाम झाले.**

**१. जमीन खरेदीचे नियम: आता भारतातील कोणताही नागरिक जम्मू आणि काश्मीरमध्ये जमीन खरेदी करू शकतो.**

**२. नागरिकत्वाचे हक्क: स्थायी निवासी ही संकल्पना संपुष्टात आली आणि राज्यातील नागरिकांना इतर भारतीय नागरिकांसारखेच अधिकार मिळाले.**

**३. कायदेशीर आव्हाने: या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात अनेक याचिका दाखल झाल्या. डिसेंबर २०२३ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने या निर्णयाला वैध ठरवले आणि म्हटले की कलम ३७० हे तात्पुरते होते आणि त्याला रद्द करण्याचा सरकारला अधिकार होता.**

**कायदेशीर आणि सामाजिक परिणाम**

**१. संघराज्य संरचनेवर परिणाम: कलम ३५अ मुळे जम्मू आणि काश्मीर हे भारताच्या इतर राज्यांपेक्षा वेगळे ठरले. यामुळे राज्यात स्वायत्ततेची भावना निर्माण झाली, परंतु त्याचबरोबर भारताच्या एकसंधतेला आव्हान निर्माण झाले.**

**२. जमीन आणि नागरिकत्वाचे संरक्षण: या कलमामुळे स्थानिक लोकसंख्येचे हित आणि त्यांची सांस्कृतिक ओळख जपली गेली. विशेषतः काश्मिरी पंडित आणि इतर स्थानिक समुदायांनी सुरुवातीला याचे स्वागत केले. मात्र, कालांतराने यामुळे राज्यात आर्थिक विकास मंदावला, कारण बाहेरील गुंतवणूक आणि स्थलांतर मर्यादित झाले.**

**३. विवाद आणि टीका: कलम ३५अ वर अनेकांनी लिंगभेदाचा आरोप केला, कारण जर एखादी काश्मिरी महिला राज्याबाहेरील पुरुषाशी विवाह करत असेल, तर तिला तिचे स्थायी निवासीत्व गमवावे लागत होते, परंतु पुरुषांसाठी असा नियम नव्हता. यावरून सर्वोच्च न्यायालयात अनेक याचिका दाखल झाल्या होत्या.**

**न्यायालयीन पुनरावलोकन**

**◆ प्रेम नाथ कौल वि. जम्मू आणि काश्मीर (१९५९): सर्वोच्च न्यायालयाने असे मत व्यक्त केले की कलम ३७० आणि त्याअंतर्गत कलम ३५अ हे तात्पुरते स्वरूपाचे आहेत. न्यायालयाने हे स्पष्ट केले की या तरतुदी जम्मू आणि काश्मीरच्या विशेष परिस्थितीला अनुसरून बनवल्या गेल्या आहेत, परंतु त्यांना कायमस्वरूपी घटनात्मक दर्जा नाही.या निर्णयाने कलम ३५अ ची वैधता कायम ठेवली, परंतु त्याचे भविष्य संसदेच्या किंवा राष्ट्रपतींच्या निर्णयावर अवलंबून असल्याचे सूचित केले.**

**◆ संपत प्रकाश वि. जम्मू आणि काश्मीर (१९६९): या खटल्यात न्यायालयाने कलम ३७० आणि ३५अ च्या वैधतेला पाठिंबा दिला. न्यायालयाने असे मत मांडले की हे कलम भारत-पाकिस्तान यांच्यातील संघर्ष आणि विलीनीकरणाच्या संदर्भात आवश्यक होते. त्यामुळे ते घटनात्मकदृष्ट्या वैध ठरते.तथापि, न्यायालयाने हेही नमूद केले की कलम ३७० चे "तात्पुरते" स्वरूप संपुष्टात येण्यासाठी संसदेला निर्णय घ्यावा लागेल.**

◆ **लिंगभेदावरील याचिका:** कलम ३५अ च्या लिंगभेदी तरतुदींविरुद्ध अनेक याचिका दाखल झाल्या. उदाहरणार्थ, जर एखादी महिला बाहेरील व्यक्तीशी विवाह करत असेल तर तिचे हक्क गमावले जाणे, यावर आक्षेप घेण्यात आले. मात्र, या याचिकांवर ठोस निर्णय होण्यापूर्वीच २०१९ मध्ये हे कलम रद्द झाले.

**निष्कर्ष**

भारतीय राज्यघटनेचे कलम ३७० हे जम्मू आणि काश्मीर राज्याला विशेष दर्जा देणारी एक ऐतिहासिक तरतूद होती, जी भारताच्या स्वातंत्र्योत्तर काळातील जटिल राजकीय आणि भौगोलिक परिस्थितीतून उद्भवली. या कलमाच्या निर्मिती प्रक्रियेचा अभ्यास केल्यावर असे दिसते की, विलीनीकरण करार (Instrument of Accession), संविधान सभेतील चर्चा आणि शेख अब्दुल्ला यांच्यासारख्या स्थानिक नेत्यांच्या स्वायत्ततेच्या मागणीने या तरतुदीला आकार दिला. एन. गोपालस्वामी अय्यंगार यांनी मांडलेला हा मसुदा तात्पुरता असल्याचे सांगितले गेले, तरी तो दीर्घकाळ टिकून राहिला आणि त्याने जम्मू आणि काश्मीरला स्वतंत्र संविधान, ध्वज आणि स्वायत्तता प्रदान केली.कलम ३७० च्या घटनात्मक तरतुदींनी भारतीय संसदेची कायदा निर्मितीची शक्ती मर्यादित ठेवली आणि राज्याला केंद्र सरकारपासून स्वतंत्र अंतर्गत अधिकार दिले. या तरतुदीमुळे भारताच्या संघराज्यीय रचनेत एक असममितीय स्वरूप निर्माण झाले, ज्याने देशाच्या एकसंधतेला आव्हान देतानाच जम्मू आणि काश्मीरच्या स्थानिक ओळखीचे संरक्षण केले. तथापि, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारख्या संविधान निर्मात्यांनी या तरतुदीला विरोध केला होता, कारण त्यांना देशाच्या अखंडतेसाठी धोका वाटला होता.अनुच्छेद ३५अ च्या माध्यमातून जम्मू आणि काश्मीरच्या नागरिकांना स्थायी निवासीत्व, जमीन खरेदी आणि सरकारी नोकऱ्यांचे विशेष अधिकार मिळाले, ज्यामुळे स्थानिक संस्कृती आणि जनसांख्यिकी राखण्यात मदत झाली. परंतु यामुळे बाहेरील गुंतवणूक आणि एकीकरणाला अडथळा निर्माण झाला. ५ ऑगस्ट २०१९ रोजी भारत सरकारने कलम ३७० रद्द केल्याने या सर्व विशेष तरतुदी संपुष्टात आल्या आणि जम्मू आणि काश्मीरला इतर भारतीय राज्यांसारखाच दर्जा मिळाला. सर्वोच्च न्यायालयाने डिसेंबर २०२३ मध्ये या निर्णयाला वैध ठरवले, ज्यामुळे कलम ३७० चे तात्पुरते स्वरूप आणि त्यावर राष्ट्रपतींचा अधिकार अधोरेखित झाला.शेवटी, कलम ३७० आणि ३५अ हे भारताच्या संघराज्य संरचनेतील एक प्रयोग होते, ज्याने स्थानिक स्वायत्तता आणि राष्ट्रीय एकतेच्या संतुलनाचा प्रयत्न केला. त्यांच्या निर्मितीपासून ते रद्द होईपर्यंतच्या प्रवासातून भारताच्या घटनात्मक इतिहासातील गुंतागुंत आणि विविधता प्रकट होते. या तरतुदींनी काश्मीरच्या विशेष परिस्थितीला सामोरे जाण्याचा प्रयत्न केला, परंतु त्याचवेळी देशाच्या एकीकरणाच्या प्रक्रियेत अनेक प्रश्न आणि वाद निर्माण केले.

## संदर्भ सूची

१. भारताची राज्यघटना - पी.एम. बक्षी"

२. कलम ३७०: जम्मू आणि काश्मीरचा घटनात्मक इतिहास - ए.जी. नुरानी

३. गांधींनंतरचा भारत - रामचंद्र गुहा

४. भारतीय राज्यांचे एकीकरण - व्ही.पी. मेनन

५. भारताचा संविधानिक कायदा - डॉ. जे.एन. पांडे

६. काश्मीर: पडद्यामागील कहाणी - एम.जे. अकबर

७. भारताचा कायदेशीर आणि संविधानिक इतिहास - एम. रामा जोईस

८. भारताच्या संविधानाची रचना: निवडक दस्तऐवज" - बी. शिवा राव (संपादक)

९. जम्मू आणि काश्मीर: बदलाची लाट - लेफ्टनंट जनरल एस.के. सिन्हा

१०. काश्मीरमधील अशांतता समजून घेणे - नायला अली खान